**ठळक बातम्या**

- तीन देशांच्या दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सायप्रसमधे दाखल

- विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळाची उद्यापासून एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू

- उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू, मृतांमध्ये यवतमाळच्या तिघांचा समावेश

- मावळमध्ये कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळल्यानं काही पर्यटक बुडाले, दोन जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती

**आणि**

- पुढच्या २४ तासाकरता रत्नागिरी, रायगड या जिल्हयांना पावसाचा रेड अलर्ट, तर पालघर, ठाणे, पुणे घाट परिसर, सातारा घाट, कोल्हापूर घाट, आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले असून संध्याकाळी ते सायप्रसमध्ये पोहोचले. सायप्रसच्या लार्नाका आंतरराष्ट्रीय विमानतळावर अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिड्स यांनी त्यांचं स्वागत केलं. यानंतर लेमेसोस इथं ते तिथल्या भारतीय वंशाच्या नागरिकांशी, विद्यार्थ्यांशी तसंच व्यावसायिकांसोबत संवाद साधणार आहेत. दोन्ही नेते सायप्रसमधल्या भारतीय वंशाच्या तसंच सायप्रसच्या उद्योजकांसोबत व्यावसायिक गोलमेज बैठकीत सहभागी होत आहेत.

व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, डिजिटल सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षा यासारख्या प्रमुख मुद्यांवर राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिड्स यांच्याशी प्रधानमंत्री उद्या निकोसिया इथं द्विपक्षीय चर्चा करतील. व्यापक जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवरही दोन्ही नेते विचारांची देवाणघेवाण करणार आहेत.

<><><><>

एसटी बसनं प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्यापासून एसटी महामंडळ "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम राबवणार आहे. या मोहिमेतून विद्यार्थ्यांना एसटीचे पास त्यांच्या शिक्षणसंस्थांमधून वितरीत केले जाणार आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला तसे निर्देश दिले आहेत. शासनाकडून विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत तसंच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत विद्यार्थीनींना दिले जाणारे मोफत प्रवासाचे पास त्यांना एसटी आगारातून घ्यावे लागत होते. परंतु आता शिक्षण संस्थानी दिलेल्या माहितीप्रमाणे हे पास आता एसटी महामंडळाकडून थेट संस्थांकडे येतील आणि विद्यार्थ्यांना आपापल्या संस्थांमधून ते घेता येतील. त्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी आपल्या संस्थेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवावी अशी सूचना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी शिक्षणसंस्थांना केली आहे.

<><><><>

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचं महाबळेश्वर इथलं विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्र अद्ययावत करण्याबरोबरच राज्यातल्या शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं प्रतिपादन कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु माणिकराव कोकाटे यांनी केलं आहे. महाबळेश्वर इथं नव्यानं उभारण्यात येत असलेल्या अतिथीगृहाचं भूमिपूजन आज कृषिमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. महाबळेश्वर इथल्या संशोधन केंद्रामध्ये गव्हाच्या रोगावर संशोधन सुरू असून आता स्ट्रॉबेरीच्या संशोधनाला देखील मान्यता मिळाली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

बार्टीच्या पीएचडी विद्यार्थ्यांना २०२२ नंतर फेलोशीप मिळाली नसल्यानं संशोधनात अडचणी येत आहेत. त्यामुळे फेलोशिपसाठी लवकर जाहिरात द्यायची मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीनं बार्टीकडे केली आहे.

बार्टीकडून अनुसूचित जातीतल्या पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फेलोशिप दिली जाते. गेल्या काही वर्षांमध्ये फेलोशिप मिळाली नसल्यानं विद्यार्थ्यांनी आंदोलन केलं आहे.

फेलोशिपसाठीची जाहिरात लवकरात लवकर काढावी, या मागणीसाठी विद्यापीठ कृती समितीनं बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांची भेट घेतली. महाज्योतीप्रमाणे सेट, नेट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना बार्टीने विद्यावेतन द्यावं, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**<><><><>**

आषाढी एकादशी सोहळा येत्या सहा जुलै रोजी होत असून २६ जून ते दहा जुलै असा यात्रा कालावधी असेल. श्री विठ्ठल- रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या आणि अन्य पालख्यांचं त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणं पंढरपूरकडे प्रयाण होत आहे. त्या अनुषंगानं एकंदर व्यवस्थेबाबत राज्य सरकारतर्फे विशेष आढावा घेण्यात येत आहे. यंदाच्या आषाढी वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबतच्या अकराशेहून जास्त दिंड्यांना प्रती दिंडी वीस हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा शासन निर्णयही काल जारी झाला आहे.

**<><><><>**

उत्तराखंडमध्ये केदारनाथ परिसरात असलेल्या गौरीकुंड खार्क या डोंगराळ भागात आज सकाळी खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर झाडाला धडकून झालेल्या अपघाताची चौकशी 'एएआयबी' अर्थात, 'विमान अपघात तपास विभाग' करणार आहे. सहा यात्रेकरू आणि पायलटसह सात जणांचा या अपघातात मृत्यू झाला. यामध्ये यवतमाळच्या वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

या घटनेनंतर, धामी यांनी एक उच्चस्तरीय बैठक बोलावली, सुरक्षेच्या कारणास्तव या प्रदेशातल्या सर्व खासगी आणि शटल हेलिकॉप्टर सेवा उद्यापर्यंत स्थगित करायचा निर्णय या बैठकीत घेतला गेला.

'एसडीआरएफ', अर्थात, 'राज्य आपत्ती निवारण दला'नं दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त हेलिकॉप्टर पूर्णपणे जळलं असून सर्व मृतदेह बाहेर काढले आहेत.

**<><><><>**

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळा इथं इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याने काही पर्यटक बुडाल्याचं वृत्त असून दोघांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे आणि पीएमआरडीए अग्निशमन दल, तळेगाव दाभाडे पोलीस दलासह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची दोन पथकंही दाखल असून बचाव कार्य सुरू आहे. आता पर्यन्त ३८ पर्यटकांना वाचवण्यात आलं आहे. मावळ मधील कुंडमळा हे पर्यटनस्थळ आहे. आज रविवारचा सुट्टीचा दिवस असल्याने अनेक पर्यटक त्या ठिकाणी गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पूलावर पर्यटकांची संख्या जास्त झाल्यानं हा पूल कोसळल्याची शक्यता आहे. या घटनेबाबत अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. या दुर्घटनेमागील कारणांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचं पवार यांनी म्हटल आहे.

**<><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात मलकापूरजवळ विश्वगंगा नदीत बुडाल्यानं दोघी जणींचा मृत्यू झाला आहे तर चौघाजणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर मलकापूरच्या उपजिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हे सर्वजण खामगाव इथे राहणारे आणि एकाच कुटुंबातले आहेत.

दुसऱ्या एका घटनेत खामगाव पिंपळगावराजा मार्गावर एका वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी अज्ञात वाहनचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासापासून विविध जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाला आहे. **रायगड** जिल्ह्यात काल रात्रीपासून जोरदार पाऊस पडत असून महाड, पोलादपूर, माणगाव, गोरेगाव आणि म्हसळा या भागात पावसाचा जोर अधिक आहे. जिल्ह्यातल्या आंबा, कुंडलिका सावित्री, पाताळगंगा या नद्या दुथडी भरुन वाहू लागल्या आहेत. मुसळधार पावसामुळं मुंबई गोवा महामार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली.

**रत्नागिरी** जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर कायम आहे. मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी पडझड झाली, तर काही ठिकाणी रस्त्यावर दगड-माती वाहून आली.

**नाशिक** शहरात आज दुपारनंतर मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. शहराच्या काही भागांमध्ये हा पाऊस झाला असला तरी मध्यवर्ती भागामध्ये रस्त्यांना नदीचं स्वरूप प्राप्त झालं होतं. सराफ बाजारातल्या दुकानांमध्ये पाणी घुसल्यानं व्यवसायिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

दोन दिवसांपूर्वी येवला तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्यानं शेतपीकांचं मोठं नुकसान झालं होतं. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज या नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून तातडीनं पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

**<><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यात कोल्हार घोटी महामार्गावर स्लीपर कोच बस आणि ट्रकची टक्कर होऊन झालेल्या अपघातात तिघे जण जागी ठार झाले तर नऊ जण जखमी झाले आहेत. जखमींवर संगमनेर शहरातल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यता आहे. पुढील २४ तासाकरता रत्नागिरी, रायगड या जिल्हयाला रेड अलर्ट तर पालघर, ठाणे, पुणे घाट परिसर, सातारा घाट, कोल्हापूर घाट, आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**//<><><>//**